जानेवारी- २००७

# पतसंस्थांसाठी उज्वल भविष्य

सहकारी संस्थांचे २००६ - २००७ हे आर्थिक वर्ष ३१ मार्च २००७ रोजी संपत आहे. वर्षाअखेर पतसंस्थांच्या थकबाकीची टक्केवारी, सी. डी. रेषो, संस्थेचा नफा. तरलता, भाग भांडवल व ठेवीमध्ये वृध्दी इत्यादी महत्वाच्या बाबी ३१ मार्च २००७ अखेर प्रकर्षाने जाणवू लागतात. आणि २०० मार्कांच्या लेखापरिषण अंकावरून लेखापरिक्षण वर्ग ही बाब अति महत्वाची होऊन बसते. म्हणून पतसंस्थांना आणखी जागरूक करण्याचे काम आम्ही करीत आहोत.

अलीकडच्या काळात पतसंस्थांना विविध प्रकारचे टॅक्सेस लागू झाल्याचे बॅलन्सशिटमध्ये समावेश होणे आवश्यक आहे. म्हणून बॅलन्सशीटचे प्रमुख हेड्स निश्चित करणे आवश्यक आहे.

बॅलन्सशीटचे हेड्स मोघमपणे टाकून पतसंस्थांनी अडचणीत येऊ नये, यासाठी दक्षता घेणे आवश्यक आहे. तसेच थकबाकीदारांच्या संदर्भात केलेली कारवाई व करावयाची कारवाई यात एकसुत्रीपणा ठेवून अपवादात्मक काम करू नये, हे या निमित्ताने सुचवित आहोत. राज्याच्या सहकार आयुक्तांनी तसेच महाराष्ट्र व केंद्र शासनाने पतसंस्थांच्या बाबतीत जे - जे अन्यायकारक व जाचक असे धोरण स्विकारलेले आहे, किंबहुना धोरणाचा अभ्यास न केल्यामुळे त्याचे परिणाम जरी होणार असतील तरी, आहे त्याचा मोठ्या जिकरीने व अभ्यासपुर्वक प्रत्यक्ष कृतीने मुकाबला करणे क्रमप्राप्त आहे.

पतसंस्थांनी थकबाकीदार व त्यांचे जामिनदार यांची नावे थकीत रक्कम ३१ मार्च २००७ अखेरच्या अहवालावर प्रसिध्द करून पतसंस्थांना अडचणीत आणणाऱ्यांच्या विरोधात नवीन अध्याय सुरू करण्याची आवश्यकता आहे. प्रसंगी थकबाकीदारांना तुम्ही हे करणार याची जाणीव लेखी पत्राद्वारे देऊ शकता. दैनंदिन ठेवीवरील व्याज व एजंटांना देत असलेले कमिशन याचा सुध्दा ताळमेळ पतसंस्थांनी आपापल्या स्तरावर करणे आवश्यक आहे. विविध प्रकारचे टॅक्सेस व खर्चावरसुध्दा लागू असलेले विविध प्रकारचे टॅक्सेस, तसेच व्याजावर सुध्दा टॅक्सेसची कपात करण्याची सक्ती केंद्र सरकारने लागू केल्यामुळे ती दुर्लक्षुन चालणार नाही, याकडे आम्ही पतसंस्थांचे लक्ष वेधित आहोत. **पतसंस्थांमध्ये किमान दोघांनी पतसंस्थांसाठी लागू असणारे कायदे, उपविधी, टॅक्सेस इत्यादी बाबतीत १०० टक्के प्रशिक्षित होणे गरजेचे आहे.** केवळ १०० टक्के संचालक, अधिकारी, कर्मचारी यांनी प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र मिळवुन पतसंस्थांचा प्रश्न सुटु शकत नाही. प्रत्येक पतसंस्थेमध्ये हे काम आत्मसात करणाऱ्यांची संख्या कमी नाही, परंतु त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचे धाडस व सक्षमता याबाबत आत्मविश्वास असावयास हवा.

पतसंस्था लेखा परिक्षणाच्या वरच्या वर्गासाठी लेखापरिक्षकाला आपलेलसे करून घेण्यासाठी जे अस्त्र वापरतात, ते अस्त्र आता फेकून देण्यास कटीबध्द राहण्याची आवश्यकता आहे. **आपण देतो म्हणून ते घेतात** व दिल्यानंतर आपले काम होते असा समज दृढ झाल्यामुळे प्रति वर्षि करोडो रूपयांचा भ्रष्टाचार संबंधित अधिकारी राजरोसपणे खुले आम ह्याच कारणामुळे करीत असतात. अशा प्रवृत्तींना मदत करणारे किंबहुना त्यांना पैसे देऊन काम करून घेण्याची मानसिकता किमान १ एप्रिल २००७ पासून सोडून देणे आवश्यक आहे, हा आणि हाच नवीन वर्षाचा संकल्प आपल्या सर्वांसाठी आहे. **पतसंस्थांनी कोणाचे वाढदिवस, जेवणावळी,**

**देणग्या व जाहिराती यामध्ये १ रूपयादेखील खर्च करणार नाही, यासाठी शपथच घेतली पाहिजे.** एक केलेली चूक झाकण्यासाठी अनेक चुका करण्याची प्रवृत्ती जागेवर थांबली पाहिजे. संस्था कोणालाही बेकायदेशिररित्या देणार नाही यासाठी शपथबध्द होणे आवश्यक आहे. **अनावश्यक कर्मचाऱ्यांची भरती, अनावश्यक शाखांचा विस्तार जाणीवपूर्वक थांबविला पाहिजे.** एवढेच नव्हे तर आपल्या खेळत्या भांडवलाचा व्याप बघुनच कार्यालयीन वेळ ठरविणे गरजेचे आहे. आणि झेपेल एवढे व आवश्यक तेवढे विशिष्ठ ठरविलेल्या चाकोरीतच राहुन पतसंस्थांचे काम करण्यासाठी सज्ज होणे आवश्यक आहे. जागतिक बाजारपेठेत व खुल्या अर्थव्यवस्थेत भांडवलशहांच्या विरोधात पतसंस्था टिकू शकतात व आर्थिक दृष्टया सबल होऊ शकतात हे दाखविण्याचा काळ सध्या चालू आहे. अज्ञान, आळस, भंकप स्पर्धा व मिजासदारी असे अवगुण पतसंस्थांच्या आर्थिक सक्षमतेच्या निश्चितपणे आड येत असतात. **स्वत:चा मोठेपणा व फुशारकी सिध्द करण्याची जागा पतसंस्थांना घेता येणार नाही.** कुठलेही अव्यवहारिक निर्णय व कृति आपल्याला करता येणार नाही. यासाठी आणखी विचारमंथन पतसंस्थांनी करावे अशी परिस्थिती तयार झालेली आहे. आणि त्यासाठी पतसंस्थांनी हे आव्हान सक्षमपणे स्विकारण्याची गरज आहे. राजमुद्रेचा बेकायदेशीररीत्या वापर होत असताना **राज्याच्या भुतपूर्व २ सहकार आयुक्तांनी राज्यामध्ये काही दिवसापूर्वीखुले आम हैदोस घडवून आणला आहे.** त्याचे दुष्ट परिणाम सर्व सामान्य कार्यकर्त्यांनी उभ्या केलेल्या पतसंस्थांना आजही भोगावे लागत आहेत, हे सर्वश्रुत आहे. कदाचित काही काळ ह्या गोष्टी पडद्या आड झाल्या असतीलल, परंतु पतसंस्थांना ज्यांनी करोडो रुपयांना अडचणीत आणुन बेकायदेशीर गोष्टी केल्या त्याची किंमत भविष्यात मोजावी लागणार आहे. न्यायदेवता या देशात सर्वश्रेष्ठ आहे,म्हणुन पतसंस्थांनी राज्याच्या सहकार आयुक्तांचे किंवा त्यांच्या हाताखालील अधिकाऱ्यांचे कुठलेही आदेश स्वत:च्या पातळीवर कायद्याच्या चौकटीत प्रथम तपासावेत. बऱ्याच वेळी सहकारी संस्थांची नोंदणी करणारे सहकार आयुक्त व त्यांचे हाताखालिल अधिकारी हे आपल्या अधिसुचनेमध्ये / परिपत्रकामध्ये शब्दांची जगलरी करुन पतसंस्थांना फसवित असतात. हे येथुनपुढे होता कामा नये, एवढे दक्ष राहण्याची आवश्यकता आहे.

थोडक्यात आपल्या पतसंस्थांना महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० नुसार जे नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे, ते आपण सर्वांनी टिकवले आहे व त्याचे संगोपन चांगल्या प्रकारे केलेले आहे. ते येथुनपुढे ही कायम टिकविण्यासाठी व सभासदांच्या आर्थिक उत्थानासाठी कटिबध्द होऊन पतसंस्था ह्या सर्वसामान्यांच्या – सर्व सामान्यांसाठी व सामाजिक हितासाठीच आहेत हे निर्विवाद सत्य आहे. **पतसंस्थांना जरी अडचणीच्या काळात कुठलेही शासन मदत करीत नसले तरी एक दिवस शासनाला याची नोंद घेऊन पतसंस्थांसाठी पॅकेज हे जाहिर करावे लागणारच.** आपल्या पतसंस्थांचे सभासद, ठेवीदार, अधिकारी – कर्मचारी व संचालक पदाधिकारी तसेच आम्हास सातत्याने उभारी देणाऱ्या हजारो वाचकांना व आपल्या सारख्या सहकार चळवळीतीलल कार्यकर्त्यांना नूतन वर्षाच्या लाख लाख शुभेच्छा.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**